# सादप्रतिसाद

November | Year 2024-25

Volume No. 5

www.rcsrpune.com

Club No. 52116
District: 3131

# ROTARY CLUB OF PUNE SINHAGAD ROAD

## »» E-BULLETIN 2024-25 ««

Rotary

THE MAGIC OF ROTARY




"The Rotary way is to light a candle. I light one, you light one, 1.2 million Rotarians light one. Together, we light up the world."

WWW.STORY.COM

3 5 4 6 8 9 5 0 1 8 7 8 4

**Service Above Self**

LIMITED EDITION 2024 ISSUE 01

# Table of Contents


| | | |
|---|---|---|
| Chapter 1 - 7 Star Award | | 02 |
| Chapter 2 - अध्यक्षीय मनोगत | | 03 |
| Chapter 3 - संपादकीय | | 04 |
| Chapter 4 - सूर दीपावली | | 05 - 06 |
| Chapter 5 - क्रिकेटने मला काय शिकवले... | | 07 - 08 |
| Chapter 6 - Ankur Pre-PELS, Lonavala | | 09 - 10 |
| Chapter 7 - Nomination Committee Meeting | | 11 |
| Chapter 8 - कोण होईल महाज्ञानी | | 12 |
| Chapter 9 - 24 Carat Gold Songs of R. D. Burman | | 13 |
| Chapter 10 - Kashmir Before & After Article 370 | | 14 |
| Chapter 11 - Our Projects | | 15 - 16 |
| Chapter 12 - नातं | | 17 |
| Chapter 13 - जरा डोकं चालवा... | | 18 |

# 7 Star Award in Foundation Seminar






# अध्यक्षीय मनोगत




**नमस्कार मित्र मैत्रिणींनो,**

साद प्रतिसादच्या पाचव्या अंकात तुम्हा सर्वांचे पुन्हा एकदा स्वागत !!!
खरंतर आपले बुलेटिन चांगले दर्जेदार व्हावे यासाठी बुलेटिन कमिटी खूप कष्ट घेत असते. तसे त्यांनी याहीवेळी घेतलेत.

त्याचप्रमाणे आपल्या क्लबचे प्रोजेक्ट्स आणि कार्यक्रम चांगले व्हावेत म्हणून तुम्ही सगळे खूप प्रयत्न करत असता. उदाहरणच द्यायचं झालं तर **'कोण होईल महाज्ञानी'** हा कार्यक्रम चांगला होण्यासाठी **रो. मिलिंद** ने खुप प्रयत्न केले. (कारण यामधील प्रश्न, त्यासाठी लागणारी पूर्वतयारी हे सर्व वाटते तेवढे सोपे नाही). पण मिलिंदने खूप कष्ट घेवून ही स्पर्धा यशस्वी करून दाखविली.

मला एक गोष्ट नेहमी खटकत होती. ती म्हणजे आपल्या क्लब चा attendance. कितीही वेळा आवाहन केले तरी मेंबर्स येत नाहीत मीटिंगला आणि म्हणून दर्जेदार कार्यक्रम आणायचे टेन्शन असते नेहमी. यावर उपाय म्हणून यावर्षी **सिनर्जी मीटिंग** वर जरा जोर दिला.

अशीच एक सिनर्जी मीटिंग या महिन्यात झाली ज्यामध्ये नऊ रोटरी क्लब involved होते. आणि विषय पण अतिशय वेगळा होता जो आजकाल सगळ्यांच्या तोंडी असतो. तो म्हणजे **आर्टिकल 370**. विषय जरी गंभीर असला तरी डॉ. प्रतिभा आठवले यांनी सगळयांना पटेल आणि रुचेल अशा भाषेत छान सांगितला.

क्रिकेट बद्दल ऐकायला कोणाला आवडत नाही. आणि त्यातुन **सुनंदन लेले** यांचा क्रिकेट वरचा कार्यक्रम म्हणजे आपल्यासाठी दुग्धशर्करा योगच. जो आपण सर्वांनी अनुभवला.

आणखी एक अभिमानाची गोष्ट म्हणजे रोटरी वर्ष २०२४ मध्ये डिस्ट्रिक्टचा आणखी एक इव्हेंट host करण्याची संधी दुसऱ्यांदा आपल्या क्लबला मिळाली. हा आपला बहुमान आहे नाहीं का? तो म्हणजे **Ankur Pre-Pels**. हा कार्यक्रम आपण इतका यशस्वी करुन दाखविला की अनेक क्लब मेंबर्सनी आणि डिस्ट्रिक्टने पण आपले कौतुक केले.

त्यानंतर अतिशय रूक्ष अशी वाटणारी **नॉमिनेशन कमिटी मीटिंग** अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात या महिन्यात पार पडली. त्याचे celebration तो बनता है. म्हणून आपण त्या दिवशी अभिषेक हॉटेल मध्ये डिनर घेतले.

याच महिन्यात अजुन एक सुरेल असा **R D Burman** यांच्या जुन्या नव्या गाण्यांचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये ४१ क्लबनी भाग घेतला होता. एकंदरीत हे वर्ष असे धमाल चालू आहे.अजूनही छान कार्यक्रम आपल्याला करायचे आहेत पुढील सात महिन्यात. आपले असेच सहकार्य राहील ही खात्री.

**- रो. अभय देवरे**
प्रेसिडेंट

# संपादकीय



**November is Rotary foundation month.** Each year, Rotary International highlights November as Rotary foundation month to emphasise the importance of and need for Rotarian support of the Rotary foundation.

The Rotary foundation transforms your gifts into projects that change lives both close to home and around the world. Foundation empowers Rotarians to approach challenges such as poverty, illiteracy and malnutrition. Through the donations, Rotary members change lives and improve communities all over the world. Through our foundation, Rotary members have supported thousands of projects to provide clean water, fight, disease, promote peace, provide basic education and grow local economics. We have also been a leader in the fight to eradicate polio worldwide.

Dear Rotarians, donate generously for the noble cause and serve to change lives. When we give to the foundation, we do not know who will benefit in which part of the world, but the good wishes and silent blessings of the beneficiaries will definitely come to the donor.

- रो. अलका देशपांडे

# सूर दीपावली




लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया
झळाळती कोटी ज्योती या या या....

असे म्हणत दीपावलीचे आगमन झाले. तिच्या स्वागतासाठी आपल्या क्लब ने एक खास असा **सूर दीपावली** हा जुन्या नव्या भावगीतांचा कार्यक्रम ठेवला होता. खरं तर हा कार्यक्रम दीपावलीच्या सुरुवातीला असायला हवा होता परंतु काही अडचणींमुळे तो रविवारी, ३ नोव्हेंबरला झाला, असो; या कार्यक्रमा मधील एक गोष्ट अशी होती की, गाणारे सर्व कलाकार हे नवोदित असूनही त्यांनी त्यांच्या सुरेल आवाजाने सर्वांना अक्षरशः खिळवून ठेवले होते. रो सतीश यांनी म्हटल्याप्रमाणे थंडीच्या दिवसात सकाळी साखर झोपेतून उठून गाण्याच्या कार्यक्रमाला येणे म्हणजे खरंच रसिकते चे लक्षण आहे. म्हणून मला वाटते की, आपल्या क्लब ला रोटरी क्लब ऐवजी रसिक क्लब म्हणायला पाहिजे.

या कार्यक्रमा संदर्भात रो. सुधीर दार्व्हेकर यांच्या बद्दल तर काय सांगायचे? खरं तर या कार्यक्रमाचे पूर्ण श्रेय हे त्यांनाच दिले पाहिजे. कारण या सर्व कलाकारांच्या वेळा आणि मूड सांभाळणे म्हणजे आवळ्याची मोट बांधण्या सारखे होते. हे काम त्यांनीं अत्यंत खुबीने पार पाडले.

असो, हा एक विनोदाचा एक भाग होता. परंतु कालच्या सूरेल मैफिलीला आपण सर्वांनी मिळून जी भरभरून दाद दिलीत त्यामुळे कलाकारांचा उत्साह खूप वाढला होता. कोणतीही कला सादर करण्यासाठी रसिकांची दाद किती महत्त्वाची असते हे काल समजले. रो. प्रकाशने पण सुरेख शिट्ट्या वाजवुन गायकांना प्रोत्साहित केले. रो. आरतीने ही निवेदन करण्यात पण ती बिलकुल मागे नाही हे दाखवून दिले. सेक्रेटरी अनुराधा ने आरतीची ओळख छान करुन दिली. शेवटच्या गाण्यामुळे विठ्ठलमय वातावरण निर्माण झाले होते आणि रो. सतीश यांनी केलेल्या आभार प्रदर्शनामुळे कार्यक्रमाचा शेवट पण खूप सुरेख झाला. काल तुम्हा सर्वांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत आली होती. जे मेंबर्स आले नव्हते त्यांची अनुपस्थिती खुप जाणवत होती. परंतु त्यांनी फेसबुक लाईव्ह वर कार्यक्रम पाहिला हे आवर्जून सांगितल्यामुळे छान वाटले.

प्रेसिडेंट अभय बद्दल मी लिहिणे योग्य आहे का नाहीं मला माहीत नाही. परंतु हा कार्यक्रम उत्तम व्हावा म्हणुन त्याने खूप कष्ट घेतले. डेकोरेशन, रांगोळी, पणत्या आणि रसिकांची लक्षणीय उपस्थिती सुद्धा पाहिजे असा त्याचा आग्रह होता. त्याच्याबरोबर अर्थातच अनुराधा, सतीश, आरती यांनी पण त्याला खूप मदत केली. काल दिवाळीचा शेवटचा दिवस असल्यामुळें फराळ तर पाहिजेच ना. आणि त्याच्या सोबत गरम उपमा आणि गोड लवंग लतिका यामुळे फराळाची मजा वेगळीच होती.

# सूर दीपावली














# क्रिकेटने मला काय शिकवले...

Every profession, every vocation teaches you something. It's all up to you what you take and how you make it a part of your life by practsing and polishing it. When you are in the profession of Sport journalism, touring, writing and communicating with reputed Cricketers, it offers tremendous opportunities of lifetimes and life lessons drawn make you a complete man. Our yesterday's Guest Mr. Sunandan Lele enthralled the audience by his persuasive talks and enchanting pictures on the big LED screen.


Major highlights/Power Points he covered,

1. Keep running
2. यश हे क्षण भंगुर आहे
3. यशापयशात अडकायचं नाही
4. You start the day with ZERO only
5. Performance and impression
6. Qualities of true leaders who make others perform for you
7. साधना, प्रेक्टिस, सराव, रियाज
8. तपस्या, साधना
9. कष्ट करुन यश मिळतेस असे नाही
10. Connecting People
11. Indian Culture
12. Problems/Solutions
13. पाय जमीनी वर
14. Let the world remember you as... माणूस चांगला आहे।
15. गुरुचे महत्व
16. कधी काय बोलायचे
17. Delegation of authority
18. Theory of calamity & opportunity
19. If you prepare well, you play well
20. If they can do it, we can do it.

Live video of Zaakir Hussain & Sachin Tendulkar, Master & Maestro together, in conversation with Sunandan Lele was very engaging and interesting. Their discussion over the conscious and subconscious mind was captivating and had a philosophical bent.

Zakir Hussain was as subtle & sharp in his talks as his fingers are on his Tabala. Rajsingh Dungarpur & Sachin Tendulkar's intimate talk in Sharjah in 1998 where Sachin replies, "I don't see the fielders, I see the gaps only" reflects Sachin's approach to Cricket/life. Mahendra Singh Dhoni's advice to Joginder Singh before he bowled the ball that won India fitsrt T20 World Cap was a lesson for any leader in any field. **The way Lele narrated it was another lesson in storytelling by Sunandan.**

Finally, Lele's visit to Pakistan, meeting with ailing Mehdi Hasan & listening to Bhimsen Joshi's Rag Bhim Palasi for 45 minutes in his company were heart warming.


Super Sixer Synergy Programe
by
Rotary club of Pune Sahawas
in Synergy with
Sixteen Rotary Clubs
सुनंदन लेले
Guest of Honour: DG Rtn. Shital Shah
Club Partners
SOTC




काय बोलायचे






RCP Yuva
RCP NIBM


RCP Sahawas
RCP Wisdom
RCP Karvenagar
RCP Yuva
RCP NIBM
RCP Parvati
RC Pimpri
RC Bibwewadi Pune
RCP Sarasbaug
RC Poona West
RCP Bavadhan Elite

# Ankur Pre-PELS, Lonavala

We got an opportunity to host a District event **Ankur Pre- Pels** for the President Elects of RIY 2025-26 at Lonavala.

We could get an opportunity to host this event due to good contacts with District Leaders of our Rtn. Deva Ghorpade and Rtn. Sudhir Daftardar.

Our image with the District 3131 is good because of the successful execution of a District event DLA this year.

This may be the another reason for getting one more District event as a Host Club in 2024.

Today's event was a great success for our club members who wholeheartedly supported the event.

Following members from our club were participated in the event.

1. Rtn. Deva Ghorpade
2. Rtn. Manish's Ghorpade
3. Rtn. Sudhir Daftardar
4. Rtn. Bhavana Daftardar
5. Rtn . Lata Shinde
6. Rtn. Satish Kulkarni
7. Rtn. Nagesh Salgare
8. Ann Sanjana Salgare
9. Rtn. Nitin Chaware
10. Ann Neha Chaware
11. Rtn. Sunil Jadhav
12. Rtn. Jitendra Rander
13. Rtn. Amey Pasalkar
14. Rtn. Mrunmayee Pasalkar
15. Rtn. Abhay Devare




All our members reached the venue before time and worked hard to get everything ready before the arrival of the participants. All our male Rotarians were in Blue T-Shirt and female Rotarians and Anns in Yellow saree. It was a very good team work which was appreciated by the DGE, District Event Team and many PEs in their Feedback speech.

It was a good Public Image event to reach with the entire District 3131. We have shown our Audiovisual Documentary of our glorious 25 years journey to all the participants of the event.

I am grateful to have a support from our members for making this event a great success. Thank you all who supported me in this journey.










SPOUSE
PRESIDENT
25-26


SPOUSE


Ankur


Ankur


# Nomination Committee Meeting

शुक्रवारी 15 नोव्हेंबर रोजी आपली Nomination Committee ची निवड करण्यासाठीची मीटिंग झाली. Rtn. देवा हे presiding officer होते.त्यांनी सर्व माहिती खूप सोप्या रीतीने सांगितली. त्यामुळे नवीन आलेल्या सभासदांना या procedure ची सविस्तर माहिती मिळाली.या वेळी आपली prospected मेंबर Mrs. पाटील आणि त्यांची family आले होते. त्यांचे नाव आपली मेंबर मोहिनी पवार यांनी सुचविले आहे. त्यांच्या दोन मिटींग्स झाल्या आहेत.

Nomination Committee चे सहा सभासद :

1.अभय मायदेव
2.तुषार आचार्य
3.नितीन चावरे
4.श्रीकांत पाटणकर
5.भावना
6.लता

त्यानंतर सगळे उपस्थित members हॉटेल अभिषेक मध्ये fellowship साठी गेले होते.













# “कोण होईल महाज्ञानी”

रविवारच्या सुट्टीचा मुहूर्त साधून ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये रोटरी क्लब ऑफ पुणे शनिवारवाडा, सहवास, युवा, प्राइड, निगडी व सिंहगड रोड या सहा क्लबमधील ज्ञानी रोटेरीयन्सनी भाग घेतला होता.




अशा प्रकारच्या स्पर्धेसाठी काठिण्य स्तर कसा असावा आणि ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडावी म्हणून रो. मिलींद बिवलकरने खूप कष्ट घेतले होते. आजची स्पर्धा अतिशय आव्हानात्मक होती. हे सहभागी स्पर्धकांकडून समजले. यात आपल्याच क्लब तर्फे रो. अनिता आणि नेहा यांनी आयत्यावेळी भाग घेतला आणि बक्षीस ही पटकावले. स्पर्धा जरी अवघड वाटत असली तरी एकुण वातावरण एकदम खेळीमेळीचे होते. त्यामुळे आजच्या कार्यक्रमाला रंगत आली. असे माझ्या M.A. (Indology) च्या क्लास मधे असणाऱ्या सहकाऱ्याने (रो.  विवेक पाटसकर) सांगितले.

या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे लागला -

१. रोटरी क्लब ऑफ पुणे निगडी - जयंत येवले व सोनाली येवले
२. रोटरी क्लब ऑफ पुणे सहवास - अतुल जोशी व राहुल लाळे
३. रोटरी क्लब ऑफ पुणे सिंहगड रोड - अनिता पंडित व नेहा चावरे

सर्व विजेत्या संघांचे व टीम मेंबर्सचे खूप खूप अभिनंदन !!!

या कार्यक्रमाला फेलोशीप म्हणजे सगळयांचे आवडते दडपे पोहे आणि दहिवडा अशी होती.









# 24 Carat Gold Songs of R. D. Burman @ Balgandharva Rangmandir











# Kashmir Before & After Article 370 @ Seva Bhavan Hall














# Our Projects

## Our presence in GML

Rotary Club of Pune Sinhagad Road 🏠 Back

Rotary Club of Pune Sinhagad Road has been supporting an old age home in Donje village run by Mr. Paigude and his family. The person has been running the old age home for the last 20+ years and is fully dependent on support from generous people from the society.

**On 1st October, President Abhay Devare, Service Chairperson Abhay Maydeo and Public Image Director Milind Biwalkar visited the old age home and handed over the food items worth Rs. 28000/- as were requested by them. The project was self-funded from donations by club members.**





## Testimonial of our good Project



रोटरी क्लब सिंहगड रोड पुणे यांच्या तर्फे सलग २०१५ पासुन २०२४ आता पर्यंत मुलांकरीता दुध मिळत आहे.यामुळे मुले आनंदी आहेच बरोबर आरोग्यच्या दृष्टीने मुलांमध्ये तंदुरुस्तपणा दिसत आहे. रोटरी क्लब ऑफ चॅरिटेबल ट्रस्ट सिंहगड रोड पुणे यांचे मन:पुर्वक आभार तसेच आपली कृपा सावली नेहमी या यशोधरा प्रकल्पावरती रहावी हि विनंती.

या आदिवासी वंचित गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य व किराणा करिताआपणही सहकार्य करून व मदतही पाठवू शकता.....! धन्यवाद
गुगल पे.8149091844
यशोधरा मुला - मुलींचे वस्तीगृह बारडगाव दगडी, राशिन ता. कर्जत जि. अहमदनगर




This Anemia Mukta Bhatat Project is supported by our CSR partner Vitesco Technologies Pvt Ltd with the initiative of Rtn. Milind Biwalkar.




Our club was a Host Club for this Seminar.




RYE Promotion seminar hosted by our club.

# नातं

माणूस जन्मा आधीपासूनच नात्यात बांधला गेला आहे. आईच्या उदरात असल्यापासून नाती निमा ण होतात. नात्यांमधे खूश रहाण्याचे काही सोनेरी नियम आहेत. माझ्या परीने मांडण्याचा हा एक प्रयत्न.

सव प्रथम हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की ज्या प्रमाणे हातांची बोटे सारखी नसतात त्याप्रमाणे प्रत्येक व्यिक्त ही वेगळी आहे. जर बोटे एकसारखी असती तर सौंदय व सहजता गमावून बसली असती तसेच नात्यांचे आहे. ज्याप्रमाणे बोटांचे लहान मोठे पण त्यांना हीन किं वा श्रेष्ठ बनवत नाही उलट एकमेकांना पूरक ठरतात त्याप्रमाणेच नात्यांचे आहे.

ज्याप्रमाणे सूय किरण जीवनासाठी आवश्यक आहे त्याप्रमाणे काही सोनेरी नियम आपल्या कु टुंबासाठी व समाजासाठी अत्यंत महत्त्वपूण आहेत. समाज म्हणजेत्यात प रवार,शेजारी,नातेवाईक,बॉस,ऑफीस मधील सहकारी, मित्र मैत्रिणीव हितिचंतक हे सव आलेच.

1. लोकांनी तुमच्याशी जसं वागाव असं तुम्हाला वाटतं तसच तुम्ही त्यांच्याशी वागा
2. मी पासून आपण बनण्याचा प्रयत्न करा
3.कु टुंबात जे कराल ते आनंदाने व हसतमुखाने करा
4.स्वतः ला शोधा आिण स्वतः ला मदत करा
5. प रवारातील सदस्यांशी सजगतेने रहा.
6. समोरच्या व्यिक्त च्या भावना समजून घ्यायचा प्रयत्न करा.
7. िवनाअट प्रेम द्या बदल्यात प्रेमच िमळेल हे नक्की.
8. क्षमा आिण प्रायिश्चत हे खूप महत्वपूण आहे. वेळेत क्षमा मागा आिण वेळेत क्षमा करा
9.रक्षणकत व्हा
10. नात्यांमधे िभंत िनमा ण होऊ देऊ नका. झालीच तर ती फोडू न टाका.
11. नात्यांची वीण घट्ट व्हावीम्हणून. नात्यात संयम, प्रेम आिण समज असणे गरजेचे आहे.
12. नातीआरसा आहेत.आपण जसे पाहू तशी ती िदसतात स्वतःचेच प्रितिबंब
13. कोणतेही नाते हे अहंकार नामक िभंतीमुळे तुटू शकते. अहंकाराची िभंत तोडू न टाकायलाहवी.
14. एकमत असूद्या
15. अपूण तेकडू न पूण त्वाकडे जाण्याचापिहला माग म्हणजेमनातले बोला व दुसया च्या मनातले ऐका
16. एकमेकांचा स्वभाव जाणा
17. मुख्य म्हणजे आपण सव च जण चांगले आहोत. पण प िरिस्थित मुळे चांगले वाईट वागू शकतो एक अनािमक िभती. ती संपली की चांगले वागू शकतो.

हे सव माझ्या सकट सगळ्यांनालागू आहे. हो ना? चला एक छानशी नात्यांचीवीण गुंफु या आिण आपले आयुष्य प रपूण बनवूया.

नात्यात रंगले मी, नात्यात दंगले मी कळले कधी न कसे, प्रेमात नाहले मी

वाटते हवेहवेसे, हे नाते अन गोते
प र नाउमगे मजला,काही तरी हरवले ते शोधता स्वतः स्वतःला, हरवून मी बसले

प र या भेटता सखयांना,हरवले ते गवसले

एकटीच होते तरी मी, भाव एक अपूण खुलले फु ला प र मी, भेटता सकलजन .

**- रो. आरती भट**





# जरा डोकं चालवा...

त्या फिरत्या विक्रेत्याने एका घराची बेल वाजवली . दार एका बाईने उघडलं . विक्रेता आपल्या जवळील वस्तूंची माहीती सांगू लागला तेव्हा ती बाई म्हणाली

" मी तुमच्या कडून वस्तू खरेदी करेन पण त्यापूर्वी तुम्ही माझ्या प्रश्नाचे अचूक उत्तर योग्य स्पष्टीकरणासहीत दिले पाहीजे ."

" ठिक आहे . विचारा " विक्रेता म्हणाला

" मला तीन मुली आहेत . त्यांच्या वयाची बेरीज १३ आहे आणि त्यांच्या वयाचा गुणाकार तुम्हाला जो बाहेर लिहीलेला दिसतोय त्या माझ्या घर नंबर इतका आहे . तर माझ्या मुलींचे वय काय ? " बाईने प्रश्न विचारला .

विक्रेत्याने एका कागदावर आकडेमोड केली आणि म्हणाला

" तुम्ही दिलेली माहिती अपूर्ण आहे . अजून माहीती द्या . "

" माहिती अपूर्ण आहे हे अगदी बरोबर . अजून माहिती म्हणजे माझ्या मोठ्या मुलीचे केस लांब आहेत आणि ती दोन वेण्या घालते . धाकट्या दोघींचे बॉब कट आहेत " बाईने अधिक माहिती पुरवली .

" असे असेल तर उत्तर अगदी सोपे आहे " असं म्हणून तीनही मुलींची बरोबर वयं विक्रेत्याने योग्य स्पष्टीकरण देऊन सांगितली .

तुम्ही सांगू शकाल त्या तीन मुलींची वये योग्य स्पष्टीकरणासहीत ...



**- संग्राहक**
**रो. प्रकाश वसेकर**





DESIGNED & CONCEPTUALISED *by*

# STORYMATE

SHARING TALES, OCCASIONS, REMINISCENCES, YEARNINGS, MEMORIES, ANNIVERSARIES, TRAVELS, EXPRESSIONS

TRANSFORMING MEMORIES INTO EXTRAORDINARY NARRATIVES.

RotaryClubE-Bulletin

**"The greatness of a community is most accurately measured by the compassionate actions of its members."**




**November celebrates the Rotary Foundation, the driving force behind Rotary's global impact. This month highlights how the Foundation transforms contributions into projects that fight disease, provide clean water, support education, promote peace, & grow local economies.**

**Every grant & program funded by the Rotary Foundation empowers communities & creates lasting change. From eradicating polio to addressing pressing local needs, the Foundation is a testament to what can be achieved through collective action & generosity.**

**As we observe Rotary Foundation Month, let's reaffirm our commitment to service, ensuring that our efforts continue to make a difference worldwide. Together, we can do more good & build a better future for all.**

**Scan this QR for soft copy.**